मिरा भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रसिद्धी पत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचा तरुणांसाठी कौशल्य प्रशिक्षण उपक्रम**
- **रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार**

**मिरा-भाईंदर, २१ मार्च २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनात्मक पावले उचलत आहे. महानगरपालिकेच्या 'एम्प्लॉएबलिटी अॅट १८' आणि 'कॅम्पस प्लेसमेंट अॅट एमबीएमसी' या उपक्रमांतर्गत कोटक एज्युकेशन फाऊंडेशनच्या माध्यमातून तरुणांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे अनेक तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, कौशल्य विकासामुळे त्यांचे करिअर बळकट होणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराच्या विकासासाठी विविध उपक्रम, अभियान राबवित असते. महानगरपालिका तरुणांना नोकरीसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करत असून, या उपक्रमाचा शुभारंभ २७ मार्च २०२५ रोजी मिरा रोड येथील आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात होणार आहे. याच सभागृहात पुढे नियमित प्रशिक्षण वर्ग देखील सुरू राहणार आहेत. या प्रशिक्षण उपक्रमांतर्गत दोन प्रमुख अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये वित्तीय सेवा आणि विक्री (रिटेल) तसेच कस्टमर रिलेशनशिप अँड सेल्स या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रत्येकी तीन महिन्यांच्या कालावधीत हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या अभ्यासक्रमासाठी १८ ते १५ अशी वयोमर्यादा आहे. प्रत्येक प्रशिक्षण वर्गात ३० विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे. एप्रिलपासून हे प्रशिक्षण वर्ग सुरू होणार असून, यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची हमी कोटक एज्युकेशन फाऊंडेशनतर्फे देण्यात आलेली आहे.

या अभ्यासक्रमात, इंग्रजी वक्तृत्त्व, व्यक्तिमत्त्व विकास, संगणक प्रशिक्षण, इंडस्ट्रीअल व्हिजीट, तज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन आदी बाबींचा समावेश असणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रात रोजगार मिळविण्यासाठी पूर्णत: मदत केली जाणार आहे. 'बिल्ड अ सक्सेसफुल करिअर, सपोर्ट युअर फॅमिली अँड लीड अ लाइफ ऑफ डिग्निटी' हे या उपक्रमाचे ब्रीदवाक्य असून, यामुळे तरुणांना स्वत:चे आर्थिक भवितव्य उज्ज्वल करण्याची संधी मिळणार आहे.

या उपक्रमाद्वारे मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्थानिक तरुणांना सक्षम बनविण्याचे ध्येय निश्चित केले आहे, असून प्रशिक्षण पूर्ण करून नोकरी मिळवणाऱ्या तरुणांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल, तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध तसेच कौशल्य विकासामुळे त्यांचे करिअर बळकट होईल असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे.

Scanned with CamScanner